१३६	सांगली वॉर्ड क्र.१७ क मधील दत्तनगर अंतर्गत द+उ मुख्य रस्ता शुभंकरोतो अपार्टमेंट ते शुभमप्लाझा पर्यंत रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे.	१८०४९००
१३७	सांगली वॉर्ड क्र.१७ क मधील विश्रामबाग गणपती मंदिर चौक कल्याणी बिल्डींग ते धर्मराज पार्क अपार्टमेंट ८० फूटी रोड पर्यंत रस्ता साईडपट्टी दुरुस्तीसह हॉटमिक्स डांबरीकरण करणे	७९१०४००
१३८	सांगली वॉर्ड क्र.१७ क मधील त्रिकोणी बागा विकसीत करणे	३०००००
१३९	सांगली वॉर्ड क्र.१७ क मधील महावीर उद्यान कंपाऊंड बाहेरील बाजूस पेव्हींग ब्लॉक फुटपाथ करणे	२५०००००
१४०	सांगली वॉर्ड क्र.१७ क मधील मधुबन कॉलनी अंतर्गत रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे	३०००००
१४१	सांगली वॉर्ड क्र.१७ क मधील धनगरगल्ली ओपनस्पेस विकसीत करणे	१२०००००
१४२	सांगली वॉर्ड क्र.१७ मधील सहारा कॉलनी येथील किराणा दुकान ते भोसले घर पर्यंत पी.सी.सी. गटर करणे	१०००००
१४३	सांगली वॉर्ड क्र.१७ क मधील सिध्दीविनायकपुरम पिछाडी ते भोसले घर तारांराणी चौक पर्यंत रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे	९५३८००
१४४	सांगली वॉर्ड क्र.१७ क मधील दत्तनगर ८० फूटी साई बंगला ते कोनार्क अपार्टमेंट पर्यंतचा रस्ता चरदुरुस्तीसह हॉटमिक्स डांबरीकरण करणे व दत्तनगर मार्ग क्र.१४ आरंभ बंगला ते सह्याद्री बंगला पर्यंत रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे	५८२३००

Dsuryavanshi ६...

१४५	सांगली वॉर्ड क्र.१७ क मधील धामणीरोड पार्श्वनाथकॉलनी पूर्व डॉ.वाडकर हॉस्पीटल जवळील रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे	१००००००
१४६	कुपवाड शहरातील मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल विकसीत करणे	२०००००००
१४७	मिरज वॉर्ड क्र.६ अ मधील सुर्यवंशी दुकान ते दाडेल दुकाना पर्यंतचा रस्ता ट्रिमिक्स कॉक्रिट करणे.	२०००००
१४८	सांगली वॉर्ड क्र.१२ मधील कर्नाळ पोलीस चौकी ते देशी दारु दुकान व मरगुबाई मंदीर ते दत्त इलेक्ट्रॉनिक याठिकाणी स्ट्रीट लाईट व्यवस्था करणे.	३९३९६००
१४९	सांगली वॉर्ड क्र.१२ मधील वखारभाग लक्ष्मीनारायण मंदीर (माहेश्वरी भवन) ते गीतापुरोहित स्वीट मार्ट एल टाईप रस्ता हॉटमिक्स करणे.	५४८८००
१५०	सांगली वॉर्ड क्र.१२ मधील वखारभाग लोणी गल्ली येथील श्री दत्त मोटर्स ते ट्रक पार्किंग पु.+प. व द.+उ. रस्ता हॉटमिक्स करणे.	८२१९००
१५१	सांगली वॉर्ड क्र.१२ जुना बुधगांव रोड बोळाज प्लॉट येथील रस्ते हॉटमिक्स करणे.	२१८७००
१५२	सांगली वॉर्ड क्र.१२ जुना बुधगांव रोड समाजकल्याण ऑफिस समोरील संभाजीनगर येथील महादेव कोळेकर घर ते महादेव मोरे घर पु.+प. रस्ता हॉटमिक्स करणे.	२६१९५००
१५३	सांगली वॉर्ड क्र.१२ कर्नाळ रोड पटवर्धन कॉलनी गोवर्धन झोपडपट्टी येथील रस्ता कॉक्रिट करणे.	१५४५८००
१५४	सांगली वॉर्ड क्र.१२ मधील पंचशिलनगर मेंडगुळे प्लॉट येथील पडळकर घर ते अडगळे घर ते जाधव घर रस्ता हॉटमिक्स करणे.	१२७२५००
१५५	सांगली वॉर्ड क्र.१२ मधील वखारभाग हॉटेल अंबा भवन ते ईदगाह ते बायपास रस्ता पर्यंत द.+उ. रस्ता हॉटमिक्स करणे.	९१७५२००
१५६	सांगली वॉर्ड क्र.१९ मधील सावरकर मार्ग क्र.४ व ५ मध्ये ओपन स्पेसला कंपाऊंड करणे.	३०००००
१५७	वार्ड क्र. ५ अ मधील म्हैसाळ रोड, चमडेवाले बिल्डिंग जवळील रस्ता कॉक्रिटीकरण करणे.	३०००००
१५८	प्रभाग क्र ५ अ मधील लामदाडे मळा येथील रस्ता डांबरीकरण करणे.	१०००००
१५९	प्रभाग क्र. ५अ मधील बोलवाड रोड दक्षिण बाजूचे रस्ते अंतर्गत रस्ते करणे.	१०००००
१६०	मिरज वॉर्ड क्र.६ ब मधील मुजावर गल्ली अंतर्गत रस्ते करणे	२०००००
१६१	वॉर्ड क्र.११ ड मधील शिवाजी हॉसिंग सोसा.मधील अंतर्गत पी.सी.सी. गटर करणे.	२०००००
१६२	कुपवाड शहरातील मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल परिसर विकसीत करणे	१०००००००
१६३	वॉर्ड क्र.१९ लक्ष्मीनगर मधील अंतर्गत रस्ते मुरमीकरण करणे	१०००००
१६४	बेथेलनगर मिरजवाडी मधील रस्ता कारपेट करणे	१५०००००
१६५	वॉर्ड क्र.७ मधील समतानगर येथील अंतर्गत रस्ता हॉटमिक्स करणे	२५०००००
१६६	वॉर्ड क्र.७ मधील गंगानगर येथील स.नं.७९३/६ब ओपनस्पेस विकसीत करणे	२०००००
१६७	वॉर्ड क्र.३ मधील इस्त्राईलनगरव रवींद्र नगर येथील अंतर्गत रस्ते करणे	२०००००
१६८	कुपवाड वार्ड क्र.९ मधील महादेव मंदीर रजपूत कॉलनी येथे सभामंडप उभारणे	२०००००
१६९	कुपवाड वॉर्ड क्र.९ (अ) मधील शिंदेमळा येथील राक्षे घर ते कस्तुरी अपार्टमेंट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.	१०००००
१७०	सांगली वॉर्ड क्र.११ मधील पाटणे प्लॉट नं.१२ व १३ मधील अंतर्गत रस्ता काँक्रीट व गटर करणे	७०००००
१७१	कुपवाड वॉर्ड क्र.१ अ मधील प्रकाशनगर येथील अंतर्गत रस्ते काँक्रीट करणे	१०००००
१७२	कुपवाड वॉर्ड क्र.२ अ मधील आलिशान कॉलनी मधील अंतर्गत रस्ते काँक्रीट करणे	१०००००
१७३	कुपवाड वॉर्ड क्र.१ (ड) विजयनगर मधील अंतर्गत रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे.	२५०००००
१७४	मिरज वॉर्ड क्र.२० कोल्हापूर रोड कमला गोसावी घर / गल्ली परिसरातील अंतर्गत रस्ते काँक्रीट करणे.	१०००००
१७५	रमा उद्यान पुर्व बाजु ते मिरज पंढरपूर रोड स्मशानभुमी पर्यंतचा रस्ता करणे.	७५०००००
१७६	प्रभाग क्रं.३ मध्ये महापालिकेच्या खुला भुखंडावर मराठा समाजासाठी सभा मंडप बांधणे.	५०००००
१७७	जगदाळे घर ते यादव मळा ते ओढ्यापर्यंतचा जुना कळंबी रोड डांबरीकरण करणे.	५०००००

१७८	मिरज शहरामध्ये वाहतुक सोयीसाठी नवीन सिग्नल यंत्रणा कार्यान्वीत करणे.	५००००००
१७९	वाटवे गल्ली विठ्ठल मंदीर ते संभा तालीम पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे.	२५०००००
१८०	प्रभाग क्र. ३ हॉटेल टोमॅटो मागील महापालिकेच्या मालिकीच्या खुल्या जागेत सभामंडप बांधणे.	३०००००
१८१	प्रभाग क्र. ३ सर्वे. नं. १८५/अ विद्यानगर प्लेजर पार्क येथील महापालिका ओपन स्पेस विकसित करणे.	३०००००
१८२	प्रभाग क्र. २ सावळी रोड हनुमान नगर ते काळे मळा जुना तानंग रस्ता डांबरीकरण करणे.	५०००००
१८३	मिरज कृष्णा घाट रोड चंद्रकांत हलुवान घरामागे जुना पडी रस्ता मुरूमीकरण व खडीकरण करणे.	२५०००००
१८४	कुपवाड प्रभाग क्र. २ साई कॉलनी पोलिस लाईन येथील अंतर्गत रस्ते करणे.	१५०००००
१८५	कुपवाड प्रभाग क्र. २ वाघमोडे नगर गुलमोहन कॉलनी हनुमान नगर विद्यानगर कॉलनी पार्श्वनाथ नगर स्वामी मळा येथे दिशा दर्शक बोर्ड लावणे.	१५०००००
१८६	कुपवाड प्रभाग क्र. २ मधील गावठाण मधील अंतर्गत रस्ते करणे.	२५०००००
१८७	कुपवाड प्रभाग क्र.२ मधील बजरंगनगर येथील पेंटर राजु थोरात घर ते चौगुले घरापर्यंतचा रस्ता कॉक्रीटी करणे व पीसीसी गटर करणे.	३०००००
१८८	मिरज प्रभाग क्र. २ भारतनगर भोसले प्लॉट येथील ओपन स्पेस विकसित करणे.	२५०००००
१८९	मिरज प्रभाग क्र. ३ अ ऑक्सिजन पार्क ते हनुमान मंदिर पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे.	२५०००००
१९०	मिरज प्रभाग क्र. ३ मधील अंतर्गत रस्ते करणे	२५०८०००
१९१	मिरज प्रभाग क्र. ३ मिलतनगर येथील रस्ते व गटर करणे.	१५०००००
१९२	मिरज प्रभाग क्र. २ विद्यानगर येथील रत्नत्रय कॉलनी व गणराज हौसिंग सोसायटी येथील अंतर्गत रस्ते करणे.	२५०००००
१९३	मिरज प्रभाग क्र.३ आदर्श कॉलनी येथील ओपन स्पेसला संरक्षक भिंत बांधणे.	१५०००००
१९४	मिरज प्रभाग क्र. ३ कल्पतरू कॉलनी येथील ओपन स्पेस सुधारणा करणे.	१००००००
१९५	मिरज प्रभाग क्र. ४ मालगांव रोड अर्थव कॉलनी येथे गुरव घर ते माहि अर्पाटमेंट पर्यंत ड्रेनेज व रस्ता करणे.	२००००००
१९६	मिरज प्रभाग क्र. ४ जिलेबी चौक येथील निकम वाडा ठोंबरे घर ते नेहेरकर घर व गोपाळ कृष्ण मंदिर ते मोरे घर बोळ रस्त्यांची सुधारणा करणे.	२००००००
१९७	प्रभाग क्र. ४ मधील कलावती मंदीर, रामलिंग मंदिर, विठ्ठल मंदीर, आण्णाबुआ मंदिर, संत वेणास्वामी मठ, नामदेव मंदिर, विजापुर वेस विठ्ठल मंदिर येथील आकर्षक दिपस्तंभ बसविणे.	३०००००
१९८	प्रभाग क्र. ४ मालगांव रोड सिध्दनाथ कॉलनी येथे अंतर्गत रस्ते करणे.	१५०००००
१९९	प्रभाग क्र. ४ मालगांव रोड हॉटेल मातोश्री व बाळुमामा मंदीर परिसरातील रस्ते करणे.	१५०००००
२००	प्रभाग क्र. ४ मालगांव रोड कलावती कॉलनी येथे रस्त्यांच्या दोन्ही बाजुस फुटपाथ करणे.	१००००००
२०१	प्रभाग क्र. ४ सांगलीकर मळा बकुळबाग येथील महापालिकेचा खुला भुखंड विकसित करणे.	२००००००
२०२	मिरज प्रभाग क्र.४ मालगांव रोड दर्गा मोहल्ला ते अल ईकरा स्कूल पर्यंत हॉटमिक्स रस्ते करणे.	१००००००
२०३	मिरज प्रभाग क्र. ४ मालगांव रोड येथील अमननगर रस्ता क्र. १ ते ७ अंतर्गत रस्ते जोडणे.	१५०००००
२०४	मिरज प्रभाग क्र. ५ किल्ला भाग नरसिंह मंदिर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे.	२००००००
२०५	मिरज प्रभाग क्र. ५ रेवणी गल्लीतील अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे.	५०००००
२०६	मिरज प्रभाग क्र. ७ मधील जनवाडे मळा अंतर्गत रस्ते व गटारी करणे.	२५०००००
२०७	मिरज प्रभाग क्र. ५ मधील कोलापूरे घर ते महात्मा फुले कॉलनी, वैरण बाजार टी-टाईप रस्ता करणे.	१००००००
२०८	मिरज प्रभाग क्र. ५ श्री.संभाजी मेंढे घर ते श्री. धुळूबूळू घर रस्ता डांबरीकरण करणे.	१५०००००
२०९	मिरज प्रभाग क्र. २० मधील चौगुले प्लॉटमधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.	१००००००
२१०	मिरज प्रभाग क्र. २० बौध्द वसाहत मधील महेंद्र दामोदर बनसोडे घर ते संदीप मोहन बनसोडे घर ते ऐतबा बनसोडे घर रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१५०००००

D/Suryavanshi

२११	मिरज सावळी रस्त्यावरील **हनुमान** मंदिर **पासुन** लोकवस्ती कडे **जाणारा रस्ता** मुरूमीकरण **करणे.**	१००००००
२१२	मिरज येथील हडको कॉलनी, गणपती मंदीर ते कुंभार मारवाडी **घर** येथील अंतर्गत **रस्ता कॉक्रीटीकरण करणे.**	१००००००
२१३	गणेशमळा येथील औद्योगिक **वसाहत** सर्व्हे नं. २९/१ **ब** मंजूर रेखांकन मध्ये पाण्याची पाईप **लाईन टाकणे.**	५०००००
२१४	मिरज **प्रभाग क्रं.७** मधील स्वामी मंदिर समोरील **बाजुस** पेव्हर ब्लॉक बसविणे.	१५०००००
२१५	मिरज **प्रभाग क्र. ७** मधील स्वामी समर्थ मंदिराला **आत** जाण्यासाठी **रस्ता** करणे.	१५०००००
२१६	मिरज **प्रभाग क्र. ७ प्रताप** कॉलनी अंतर्गत रस्ते करणे.	३०००००
२१७	**प्रभाग क्र. ७ MSEB समोरील रस्ता** हॉटमिक्स डांबरीकरण करणे.	१५०००००
२१८	मिरज **प्रभाग क्र. ७** सोमशेखर हॉस्पिटल **रस्ता** डांबरीकरण करणे.	१०००००
२१९	मिरज **प्रभाग क्र. ७ शाम** भंडारे **यांच्य** घरासमोरील **रस्ता** करणे.	५०००००
२२०	मिरज **प्रभाग क्र. ७** लिमये **घर** ते टॅक्सी **स्टॅन्ड** समोरील **रस्ता** करणे.	१०००००
२२१	शनिवार पेठ शरीफ गोडावुन ते चिवटे **घर रस्ता** करणे.	१५०००००
२२२	शनिवार पेठ **डॉ.** छपरे बोळ कॉक्रीटीकरण करणे.	१०००००
२२३	**प्रभाग क्र. ३** मधील गांधी चौक ते ॲडव्होकेट **जाधव** (गवळी **कट्टा** मार्ग) यांचे घरा पर्यंतचा **रस्ता ट्रीमिक्स कॉक्रीट करणे.**	२५०००००
२२४	मिरज **प्रभाग क्र. ३** मधील **डॉ.**भोसले हॉस्पिटल (गवळी **कट्टा**) यांचे समोरील **रस्ता** ट्रीमिक्स **कॉक्रीट करणे.**	१००००००
२२५	मिरज **प्रभाग क्र.३** मधील परीट गल्ली येथील **रस्ता** ट्रीमिक्स करणे.	१५०००००
२२६	**प्रभाग क्र १६** येथील **दरबार** हॉल **राजवाडा** परिसरातील रस्तयाचे डांबरीकरण तसेच **पाण्याच्या** निचऱ्याचे व्यवस्थापन करणे	११०००००
२२७	प्रभाग क्र १ शासकीय औद्यगिक **प्रशिक्षण संस्था**, सांगली यांचेकरिता विद्युतीकरण करणेकरिता निधी मिळणे.	२०००००
२२८	**प्रभाग क्र १** भगिनी निवेदिता प्रतिष्ठान,सांगली संचलित निवेदिता **बालसदन, यशवंतनगर, सांगली** या बालगृहातील **मुलींसाठी स्वच्छतागृह व ड्रेनेज व्यवस्था करणे.**	२००००००
२२९	प्रभाग क्र १ भगिनी निवेदिता प्रतिष्ठान,सांगली संचलित निवेदिता **बालसदन, यशवंतनगर** येथील रस्ता करणे.	२००००००
२३०	**प्रभाग क १ यशवंत नगर** येथील स.नं २४७/१ **ब** मधील **शासनाच्या** जागेत **स्वच्छता गृह** बांधकाम करणे.	३४०००००
२३१	प्रभाग क्र १ यशवंत नगर येथील **शासनाच्या** जागेत **कुंपण** भिंतीचे **बांधकाम** करणे.	१५०००००
२३२	प्रभाग क्र १ गौतम हौसिंग सोसायटी मधील अंतर्गत रस्ते व गटर करणे	४०००००
२३३	प्रभाग क्र २ कुपवाड मधील गणाधीश पार्क येथील अंतर्गत **रस्ता** करणे. मोरया हॉटेल ते गायकवाड यांचे घर, विठ्ठल पाटील ते महेश मलमे घर, **सुभाष** पुंजे ते सत्यवान सुतार यांचे घर, गायकवाड घर ते देसाई घर रस्ता करणे.	४०००००
२३४	प्रभाग क्र.०८ जिजामाता कॉलनी मधील कुरणे घर ते गोविंद पाटील घर रस्ता रुंदीकरण करणे	३५०००००
२३५	**प्रभाग क्र ०८ शामनगर** येथील **गुरव घर** ते सांळुखे **घर व** ढोबळे घरासमोरील रस्ते करणे	२०००००
२३६	प्रभाग क्र ०८ **शामनगर** येथील जि.प. **शाळा** ते कोळेकर घरापर्यंत **रस्ता** करणे	२५०००००
२३७	**प्रभाग क्र ०८ शामनगर** येथील **राधा** माचरे **घर** ते हातगळे **घर व** मीनाक्षी **जाधव घर** ते ननवरे घरापर्यंत रस्ते करणे.	१५०००००
२३८	प्रभाग क्र ०८ **शामनगर** येथील वाघमोडे **घर** ते शेबाळे घरापर्यंत **रस्ता** करणे	१०००००
२३९	प्रभाग क्र ०८ **शामनगर** येथील दुर्गामाता मंदिर ते पाण्याची टाकी परिसरातील अंतर्गत् रस्ते करणे	३०००००
२४०	**प्रभाग क्र ०८ शामनगर** येथील खांडेकर **घर** ते ठोबरे घरापर्यंत **रस्ता** करणे.	२०००००

Dfsuryavanshi.

२४१	प्रभाग क्र ०८ मधील विद्यानगर गल्ली नं. ४ रस्ता रूंदीकरण करणे.	३५०००००
२४२	प्रभाग क्र ०९ मधील सरस्वती नगर येथील कृष्णा मॅरेज हॉल ते स्टूडिओ ८८८ ते सुयोग क्रेन्स पर्यंतचा रस्ता करणे.	८४०००००
२४३	प्रभाग क्र. ०९ मधील सरस्वतीनगर येथील वसंत बंगला ते कृष्णा मॅरेज हॉल पर्यंतचा रस्ता रूंदीकरणासह करणे.	७००००००
२४४	प्रभाग क्र.०९ मधील सरस्वतीनगर येथील जिल्हा उद्योग केंद्राजवळ ते PWD ऑफिस च्या मागे C टाईप रस्ता करणे.	३०००००
२४५	प्रभाग क्र. ०९ मधील सरस्वतीनगर येथील चंदूकाका सराफ ते संजय डोंडिया रामकृष्ण घर पर्यंतचा रस्ता करणे.	४०००००
२४६	प्रभाग क्र.१० (अ) मधील मिरा हौसिंग सोसायटीच्या पुर्वेस ओंकार अपार्टमेंट समोर जासूद मळा येथील नाल्यावर सीडी वर्क/ बॉक्स सेल चे बांधकाम करणे.	७०००००
२४७	प्रभाग क्र. ११ वसंतदादा औद्योगिक वसाहत मध्ये आयटीआय कॉलेजच्या उजव्या बाजुचा इगल इंडस्ट्री कडे जाणारा रस्ता करणे.	६०००००
२४८	प्रभाग क्र. ११ मधील सांगली माधवनगर रोड वरील वसंतदादा औद्योगिक वसाहतीमधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.	२०००००००
२४९	प्रभाग क्र. १२ मधील रा.मा.१५४ ते शितोळे घर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.	३०००००
२५०	प्रभाग क्र. १२ मधील सुशांत गार्डन ते कदम घर व गजराज कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.	३५०००००
२५१	प्रभाग क्र. १२ मधील बापू काटकर घर ते किरण माने घर पर्यंतचा रस्ता करणे.	३०००००
२५२	प्रभाग क्र.१२ मधील रा.मा.१५४ ते लोखंडे घर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.	२०००००
२५३	प्रभाग क्र. १४ मधील गुप्ते हॉस्पिटल कोल्हापूर रोड ते काळी वाट पर्यंत रस्ता करणे.	३०००००
२५४	प्रभाग क्र. १६ राम मंदीर चौक ते धनगर गल्ली दुर्गामाता मंदीरपर्यंत व जय भवानी रोड वरील धनगरगल्ली कोपरा ते खणभाग पोलीस चौकीपर्यंत हॉटमिक्स रस्ता करणे.	३०००००
२५५	प्रभाग क्र. १८ विश्वविनायक चौक ते तिरंगा चौकापर्यंत बंदिस्त गटर करणे.	३५०००००
२५६	प्रभाग क्र.१८ रूक्मिणी नगर येथील गल्ली नं.४,५,६,७,८ अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.	४५०००००
२५७	प्रभाग क्र. १८ कोल्हापूर रोड ते गुंजाटे गॅरेजकडे जाणारा रस्ता करणे.	३०००००
२५८	प्रभाग क्र. १९ मधील ८० फुटी रोड ते सहयोग नगर चौक ते प्रजिमा क्र. ८५ रस्ता डांबरीकरण करणे.	९०००००
२५९	प्रभाग क्र. १९ मधील १०० फुटी रोड ते येस बॅंक ते रेवन्नत अपार्टमेंट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२०००००
२६०	कुपवाड वॉर्ड क्र.१ बालाजीनगर येथील बाळकृष्ण नगर सोलंकार अपार्टमेंट ते खांडेकर घरापर्यंत पी.सी.सी. गटर करणे	१२०००००
२६१	कुपवाड वॉर्ड क्र.९ मधील शिंदे मळा येथील अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे	२५०००००
२६२	कुपवाड वॉर्ड क्र.९ मधील सह्याद्रीनगर येथील सुमंगल वास्तू अपार्टमेंट ते हुसेन प्लाझा अपार्टमेंट पर्यंत रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे	१०००००
२६३	सांगलीवाडी वॉर्ड क्र.१३ मधील जोतीबा मंदिरमागे सुतार प्लॉट सुनिल कोळी घर ते गजानन सिध्द घर रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे	५०००००
२६४	गव्हर्मेंट कॉलनी वॉर्ड क्र.१९ मधील कलाकरूणा अपार्टमेंट ते अष्टविनायक चौक रस्ताहॉटमिक्स डांबरीकरण करणे	१३०००००
२६५	कुपवाड वॉर्ड क्र.१ मधील भगीनी निवेदिता समोरील रसता सुधारणा करणे	१५०००००
२६६	सांगली वॉर्ड क्र.१८ मधील शेख घर ते मुजावर घरापर्यंतच्या रस्त्यास दोन्ही बाजू पी.सी.सी. गटर करणे.	२०००००
२६७	सांगली वॉर्ड क्र.१८ मधील अन्वर शेख घर ते नबी मुजावर घरापर्यंतचा रस्ता सुधारणा करणे.	१५०००००
२६८	मिरज येथील भोकरे कॉलनी परिसर अंतर्गत रस्ते विकसित करणे.	५०००००
	एकूण र.रु.	५५८३४३६२८

D.P. Suryavanshi

तसेच सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेकडून तयार करण्यात आलेल्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत तयार केलेल्या प्रस्तावामध्ये नमुद असलेली कामे सदर योजनेसाठी असलेल्या महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र.-एन यु आर २०१०/प्र.क्र.३१७/१०/नवि-३३, दि.०८/११/२०१० मधील परिच्छेद क्र.-२ अभियाना अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांसाठी दिलेल्या निर्देशानुसार लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित केले असून सदर क्षेत्रातील कामास अर्थसहाय्य मिळणे करीता सुधारणा कार्यक्रमाच्या दृष्टीने महानगरपालिकेने खालील प्रमाणे कार्यवाही ठेवली आहे.

अ. क्र.	सुधार कार्यक्रम	सद्यस्थिती	पुर्ण करण्याचा कालावधी
१.	व्दिनोंद लेखापध्दतीचा अवलंब करणे	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
२.	महानगरपालिका कामकाजाचे संगणकीकरण करणे.	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
३.	मालमत्ता करविषयक सुधारणा	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
४.	उचीत उपभोक्ता आकार वसुली संबंधी सुधारणा	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
५.	गरीबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षीत निधीची तरतुद करणे.	तरतुद करणेत आली आहे.	-

सदर नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत या महानगरपालिकेस प्रकल्प किंमतीच्या ७०% अनुदान व ३०% महानगरपालिका हिस्सा अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. त्याप्रमाणे प्रकल्प राबविणे करीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना (जिल्हास्तर) महानगरपालिका हिस्सा यासाठी आवश्यकते प्रमाणे वेळोवेळी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करणेस महापालिका तयार आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान.

श्रीमती लक्ष्मी सरगर

ठराव सर्वानुमते मंजुर

D. M. Suryavanshi.
महापौर,

अनुमोदक :-

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ **दिनांक :- १९/०५/२०२३**

ठराव क्रमांक :- ५११

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (कर निर्धारण व संकलन विभाग,सांगली) यांचे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड या तिन्ही नगरपालिकेची मिळून एकत्रित महानगरपालिका दि.०९/०२/१९९८ रोजी अस्तित्वात आली आहे. तत्कालीन सांगली नगरपालिका अस्तित्वात असताना सन १९९२-१९९३ मध्ये पुर्नसर्व्हेक्षण केले होते. तद्नंतर प्रथम कुपवाड विभागाचे पुर्नसर्व्हेक्षण सन २००३-२००४ सालात पुर्ण करुन, अंतिम बिले २००४-२००५ मध्ये देण्यात आलेली होती. आणि मिरज विभागाचे पुर्नसर्व्हेक्षण २००६-२००७ मध्ये व सांगली विभागाचे पुर्नसर्व्हेक्षण २००७-२००८ मध्ये पुर्ण करणेत येवून, सांगली व मिरज विभागाची अंतिम बिले सन २००९-२०१० मध्ये देण्यात आली आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ कराधान नियम २१ (२) नुसार दरचार वर्षाने निदान एकदा तरी नविन आकारणी पुस्तक तयार करणे बंधनकारक आहे. सांगली मिरज व कुपवाड महापालिकेच्या शहर हद्दीत सद्यस्थितीत करपात्र नोंद असलेल्या सांगली ७७७२३ मिरज ३९५९१ कुपवाड २८४०२ अशा ~~मिरज~~ एकूण १,४५,७१६ इतक्या मिळकती आहेत. सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाची चालू वार्षिक मागणी ४८ कोटी ६० लाख इतरकी सांगली विभागामध्ये ५६ मिरज विभागामध्ये २८ कुपवाड विभागामध्ये १३ असे एकूण तिन्ही विभागामध्ये वसुली कामी एकूण ९७ भागाची रचना करण्यात आली आहे.

मा.महाराष्ट्र शासन यांचे दि.२२ आक्टोंबर २०१८ चे पत्रानुसार जी.आय.एस.प्रणालीद्वारे सर्व्हेक्षण करुन घेणेबाबत झाले आदेशानुसार मान्यता प्राप्त त्रयस्थ जी.आय.एस.प्रणालीद्वारे पुर्नसर्व्हेक्षण करुन घेणे उचित होणार आहे.

मा.महाराष्ट्र शासन यांचे १५ वा वित्त आयोगामध्ये अनुदान प्राप्तीसाठी मालमत्ता करात उत्पन्न वाढ करणेबाबत शासन पत्र क्र.नपप्रस/२०२२/१५वावि/कक्ष-५/५९३१ दि.२७/१२/२०२२ रोजी निर्देश झाले आहेत.त्यानुसार उत्पन्न वाढविणे गरजेचे व आवश्यक असून महापालिकेस विकास कामासाठी महापालिकेच्या उत्पन्नातून निधी उपलब्ध होणार आहे. तसेच यापुर्वी झालेल्या लेखापरिक्षणामध्ये महापालिका अधिनियमातील तरतुदीनुसार दर पाच वर्षानी महापालिका हद्दीमधील मिळकतींचे पुर्नसर्व्हेक्षण होणे गरजेचे असताना मिळकतीचे पुर्नसर्व्हेक्षण न केले बाबत आक्षेप नोंदविणेत आला आहे.

महापालिका क्षेत्रात कोअर प्रोजेक्ट ॲण्ड कन्स्लटंन्स प्रायव्हेट लि.अमरावती या कंपनीकडून नमुन्याद्वारे सर्व्हे करणेकरीता महापालिकेच्या सांगली विभागाकडील भाग क्र.१०१ जी.आय.एस.प्रणाली राबवून पुर्नसर्व्हेक्षण केले आहे. त्यामध्ये पुर्वीच्या मिळकत संख्या ४९० इतक्या होत्या. परंतु बिनचूक केलेल्या पुर्नसर्व्हेक्षणामध्ये ओपन प्लॉट २४८ व बांधीव ७५ अशा एकूण ३२३ इतक्या नविन मिळकती आढळून आलेल्या अशा एकूण मिळकती ८१३ इतक्या आहेत.

उपरोक्त बाब विचारात घेता जी.आय.एस.कर प्रलाणी राबवून त्रयस्थ कंपनीकडून पुर्नसर्व्हेक्षण करणे सोयीचे होणार आहे. ड्रोनद्वारे केलेल्या सर्व्हेमुळे कामामध्ये पारदर्शकता व अचुकता इमारतीचे,छायाचित्रे इत्यादी सर्व अचुक व बिनचुक माहिती संपुर्ण पुराव्यासह उपलब्ध होणार असून, महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ होणार आहे. तसेच १५ व्या वित्त आयोग वितरण करीता उत्पन्न वाढीबाबत निर्देश दिलेले असलेने, याकामी जी.आय.एस.प्रणालीद्वारे सर्व्हेक्षण करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर निविदा मागविणेस व त्याकामी येणारे अनुषंगिक खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

कर निर्धारक संकलक

सूचक :- श्री.संतोष पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री.मैनुद्दीन बागवान D.P. Suryavanshi

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ **दिनांक :- १९/०५/२०२३**

ठराव क्रमांक :- ५१२

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (अग्निशमन विभाग) यांचे दि.१८/०५/२०२३ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

दि.१६/०५/२०२३ रोजी महापुराचा सामना करण्यासाठी आवश्यक साहित्यांचे mockdrill मा.जिल्हाधिकारी, मा.महापौर,पदाधिकारी व सन्मा.सदस्य यांचे समवेत सांगली येथे घेण्यात आले होते. त्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारीसो यांनी आपत्तीचे वेळी सामना करण्यासाठी आवश्यक असलेल्या साहित्यांची यादी करुन त्यासाठी आवश्यक असलेला निधी जिल्हा नियोजन समितीकडे मागणी करणेबाबत निर्देश दिलेनुसार खालील प्रमाणे नमुद केले आवश्यक असलेले साहित्यांचा तपशिलानुसार अंदाजे एकूण र.रु.१,०९,५०,०००/- मात्रचा प्रस्ताव निधी उपलब्धतेसाठी जिल्हा नियोजन समिती,जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	तपशिल	अंदाजे किंमत	आवश्यक नग	एकूण किंमत
१.	HDPE Speed Rescue Boat	२०,००,०००/-	२	४४,००,०००/-
२.	रेस्क्यु स्कुटर बोट	३,००,०००/-	३	९,००,०००/-
३.	फायर ब्लँकेट	५०,०००/-	६	३,००,०००/-
४.	दुचाकी बुलेट इलेक्ट्रा मॉडेल	२,१०,०००/-	२	४,२०,०००/-
५.	दुचाकी बुलेट फायर फायटींग इक्युपमेंट	७,००,०००/-	२	१४,००,०००/-
६.	मॉडर्न अॅपरल्स केवलर अॅल्युमिनी सुट	७३,०००/-	१०	७,३०,०००/-
७.	फायर प्रॉक्सिती मेटी सुट कोट व ट्राऊझर	३०,०००/-	४०	१२,००,०००/-
८.	ब्रिदींग अॅपरेटस सेट	१,६०,०००/-	१०	१६,००,०००/-
			अंदाजे एकूण र.रु.	१,०९,५०,०००/-

सूचक :- श्री. संतोष पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री. मैनुद्दीन बागवान महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ **दिनांक :- १९/०५/२०२३**

ठराव क्रमांक :- ५१३

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज वॉर्ड क्र.६ व वॉर्ड क्र.२ मधील खालील नमुद केलेल्या कामगिऱ्या १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून खर्ची टाकणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र	कामाचे नांव	रक्कम रुपये
१.	मिरज शहरातील वॉर्ड क्र.६ येथील खाटीक कब्रस्थान ते पिरनासाब चौक घीसाडी गल्ली परिसरात पिण्याच्या पाण्या करीता डी.आय.पाईप लाईन टाकणे.	८,७७,३००/-
२.	मिरज शहरातील वॉर्ड क्र.६ येथील धनगर गल्ली ते कामगार भवन येथे पिण्याच्या पाण्या करीता डी.आय.पाईप लाईन टाकणे.	८,३५,८८४/-
३.	मिरज शहरातील वॉर्ड क्र.६ येथील बाराइमाम दर्गा ते पिरनासाब परिसरात पिण्याच्या पाण्या करीता डी.आय.पाईप लाईन टाकणे.	८,३६,१५९/-
४.	मिरज शहरातील वॉर्ड क्र.६ येथील शहा डोंगरी मस्जिद ते आत्तार बोळ या परिसरात पिण्याच्या पाण्या करीता डी.आय.पाईप लाईन टाकणे.	६,००,६०६/-
५.	मिरज शहरातील वॉर्ड क्र.६ येथील धनगर गल्ली मल्लीकार्जुन देवालय ते अमन चौक येथे पिण्याच्या पाण्या करीता डी.आय.पाईप लाईन टाकणे.	५,३१,५४६/-
६.	मिरज शहरातील वॉर्ड क्र.६ येथील गवळी गल्ली ते नरवाडकर चौक या परिसरात पिण्याच्या पाण्या करीता डी.आय.पाईप लाईन टाकणे.	८,३६,४३४/-
७.	कुपवाड वॉर्ड क्र.२ मधील बामनोली मेनरोड शांत कॉलनी मध्ये पाईप लाईन टाकणे	१०,००,०००/-
८.	कुपवाड वॉर्ड क्र.२ मधील राजाराम बापू सोसायटी मध्ये अंतर्गत पाईप लाईन टाकणे	१०,००,०००/-

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्रीमती सोनाली मोहिते

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ **दिनांक :- १९/०५/२०२३**

ठराव क्रमांक :- ५१४

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्या सौ.भारती हेमंत दिगडे यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील **कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.**

महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विभाग शासन निर्णय क्र.नाषेवि २०२२/प्र.क्र.१४४/का.९, दि.०६/०९/२०२३ अन्वये महापालिका क्षेत्रातील तीन कामांसाठी र.रु.७५,००,०००/- मात्रचा निधी मंजूर झाला असून, सदर कामाची कार्यान्वय यंत्रणा सार्व.बांधकाम विभाग,मिरज आहे. त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील खाली नमुद केलेली अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रातील कामांना प्रशासकीय मान्यतेसाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम रुपये
१.	सांगली शहर येथील पेठभाग मुस्लीम दफनभूमी मध्ये पुर्व बाजूकडील आर सी सी रस्ते व गटर बांधकाम करणे	२२.००
२.	सांगली शहर येथील पेठभाग मुस्लीम दफनभूमी येथे दफनभूमी परिसरातील जुन्या रस्त्याला ट्रीमिक्स कॉंक्रिट रोड करणे, भराव मजबुती करण करणे	२०.००
३.	सांगली शहर येथील पेठभाग मुस्लीम दफनभूमी येथे दफन परिसरात सोयी सुविधा व सुशोभिकरण करणे.	३३.००
	एकूण र.रु.	**७५.००**

सूचक :- सौ. भारती दिगडे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. विष्णू माने

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ **दिनांक :- १९/०५/२०२३**

ठराव क्रमांक :- ५१५

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रामध्ये मोठ्या जनावरांच्या अवैद्य कत्तली होत असल्याने व त्यामुळे सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेने, महापालिकेच्या वतीने बेडग रोड येथे अद्यावत अत्याधुनिक सेवा सुविधासह कत्तलखाना बांधणेचा निर्णय झालेला होता. त्यानुसार महापालिकेच्या बेडग रोड येथे अद्यावत कत्तलखाना बांधून सदरचा खत्तलखाना महासभाठक्र.१३४ दि.०९/११/२०१२ रोजीचे मान्यतेनुसार ठेकेदार यांना १८ वर्षे मुदतीने महापालिकेच्या शर्ती-अटीनुसार व मे.सर्वोच्च न्यायालय,APEDA,CPCB,MPCB यांचे मार्गदर्शक सूचनानुसार चालविणेस देणेत आलेला होता.

तथापि, गेल्या तीन वर्षापासून सदरचा कत्तलखाना संबंधीत ठेकेदार यांनी करारपत्रातील शर्ती-अटीचा भंग करुन, अनाधिकृतपणे बंद ठेवलेला आहे. सदरचा कत्तलखाना बंद असल्याने मोठ्या जनावरांची नागरी वस्ती मध्ये बेकायदेशिरपणे कत्तली होत असलेचे निदर्शनास येत असलेबाबत वारंवार मा.महासभा व मा.स्थायी समिती सभेमध्ये सन्माननिय सदस्यांनी तक्रारी केलेल्या आहेत. तसेच, यापुर्वी स्थायी समिती सभापती व काही सन्मा.सदस्य यांनी सदर कत्तलखान्यास अचानकपणे भेट दिली असता, सदरचा कत्तलखाना संबंधीत ठेकेदार यांनी बंद ठेवलेचे सन्मा.सदस्यांच्या निर्दशनास आले होते. त्यानुसार सन्मा.सदस्यांनी प्रशासनाकडे तक्रारी केलेल्या आहेत. कत्तलखान्या संदर्भात सन्मा.सदस्य श्री.विजय घाडगे व सन्मा.सदस्य श्री.संतोष पाटील यांनी सभागृहामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयावर उपायुक्त मिरज यांनी कत्तलखान्या संदर्भात वारंवार सूचना देवूनही ठेकेदार हे सर्वोच्च न्यायालय व प्रदुषण मंडळ यांचे निर्देशानुसार पुर्तता करत नसलेने, ठेकेदार करारपत्रातील शर्ती-अटींचा भंग करीत असल्याने कारवाईस पात्र ठरत असलेचे सभागृहात सांगितले. तसेच, मिरज शहर पोलिस ठाण्यात बेकायदेशिर गोवंश जनावरांची कत्तल झालेल्या तक्रारी आलेल्या असून त्यामुळे सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबीचा गांर्भियपुर्वक विचार करता, सदर ठेकेदार यांचा कत्तलखान्याचा ठेका व करारपत्र तात्काळ रद्द करण्याची मागणी सन्मा.सदस्यांनी सभागृहामध्ये केली असून, त्यास ही सभा सहमती दर्शवित आहे.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ५१६

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील विश्रामबाग रेल्वे गेट नं.१३० रहदारीसाठी पर्यायी रस्त्याची व्यवस्था करणेकामी विश्रामबाग रेल्वे गेट कृती समितीने व नागरिकांनी सदर रेल्वे गेट नं.१३० येथे भविष्यातील रहदारीसाठी होणारी अडचण लक्षात घेवून जन आंदोलन केले होते त्या अनुषंगाने सदरचा प्रश्न सोडविण्यासाठी बैठकीचे आयोजन करुन मा.जिल्हाधिकारीसो यांचेशी दि.१८/०५/२०२३ रोजी झालेल्या चर्चेनुसार पर्यायी रोड करण्यासाठी महानगरपालिकेने मा.महासभेमध्ये धोरणात्मक निर्णयाचा ठराव करुन सादर करणेबाबतच्या सूचना केलेल्या होत्या.

त्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड फाटा चैत्रबन सोसायटी पासून जाणारा १०० फुटी डी.पी.रोड मल्टीस्पेयशालीटी हॉस्पिटलकडे जाणारा मुख्य रस्ता तसेच पाटबंधारे ऑफिस ते बालाजीनगर कुपवाड रोड जाणारा १०० फुटी मुख्य डी.पी.रोडला जोडणारा रस्ता विकसीत केल्यास सदरचा रस्ता हा कुपवाड शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणारा असल्याने रहदारीच्या व शहराच्या विकासाच्या दृष्टीने सोयीचा होणार आहे. तसेच सदरचा रस्ता हा कुपवाड शहर व सांगली शहरासाठी पर्यायी मार्ग म्हणूनही वापरता येणार आहे. तसेच सातारा जिल्हा मध्ये रहदराची अडचण सोडविण्यासाठी ज्या प्रमाणे रेल्वे प्रशासनाने २० फुटी रस्ता रेल्वे हद्दीतून उपलब्ध करुन दिला आहे त्याच धर्तीवर सांगलीतील विश्रामबाग रेल्वे स्टेशन ते विजयनगर रेल्वे ब्रिज अंडरपास हा रस्ता रेल्वेच्या हद्दीतून अंदाजे २० फुट रस्ता रेल्वे प्रशासनाकडून करुन घेतल्यास विजयनगर, जिल्हाधिकारी कार्यालयाकडे व जिल्हा न्यायालयाकडे जाणारा पर्यायी मार्ग म्हणून वापरता येईल व त्यामुळे विश्रामबाग रेल्वे गेटकडून जाणाऱ्या वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

वरील नमुद दोन्ही पर्यायी रस्त्यांचा विचार करुन, कुपवाड फाटा चैत्रबन सोसायटी पासून जाणारा १०० फुटी डी.पी.रोड मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटलकडे जाणारा मुख्य रस्ता तसेच पाटबंधारे ऑफिस ते बालाजीनगर कुपवाड रोडला जाणारा १०० फुटी मुख्य डी.पी.रोडला जोडणारा रस्ता हा पर्यायी मार्ग विकसीत करणेकामी मा.जिल्हा नियोजन समितीकडून अथवा रस्ते सुधार योजनेतून अथवा मा.राज्य शासनाकडून निधी मिळणेसाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. विष्णू माने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. मैनुद्दीन बागवान

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ **दिनांक :- १९/०५/२०२३**

ठराव क्रमांक :- ५१७

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील सांगली स.नं.९३/२ मधून २४.४० मी. डी.पी.रोड जात असून, सदरच्या डी.पी.रोड मुळे स.नं.९३/२ मधील जमिन बाधीत होत असलेने, सदर रस्त्याने बाधीत होत असणाऱ्या जमिनीचे भूमीसंपादन करणे आवश्यक आहे. सदरची जमिन श्री.हमीद मोमीन व अबीद मोमीन यांनी हिब्बानामा केलेला असून, सद्या हिब्बानाम्यानुसार मालक सदरी असणारे इरफान मणेर व इतर पाच यांनी सदर डी.पी.रस्तामध्ये जाणारी जागा महापालिकेस देण्यास तयारी दर्शविलेली असून, सदर डी.पी. रस्त्याने बाधीत होणाऱ्या जमिनीची नुकसान भरपाई महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२६ (अ) नुसार देवून, खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करणेस ही सभा मान्यता देत असून, याकामी मा.आयुक्त यांना ही सभा प्राधिकृत करीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मौजे सांगली येथील स.नं.४०७/१+२/१ (जुना) १०४/१+२/१ (नविन) या श्री.अजित सूर्यवंशी व इतर तीन यांच्या मालकीच्या जमिनीमधून १५ मी.नियोजीत डी.पी. रस्ता जात असून, सदर डी.पी.रस्त्याने बाधीत क्षेत्र २५२० चौ.मी.असून, सदरचे डी.पी.रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्र महापालिकेस देणेस जागा मालक यांनी संमत्ती दिलेली असून, सदर डी.पी. रस्त्याने बाधीत होणाऱ्या जमिनीची नुकसान भरपाई महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२६ (अ) नुसार देवून, खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करणेस ही सभा मान्यता देत असून, याकामी मा.आयुक्त यांना ही सभा प्राधिकृत करीत आहे.

स.स.न.र.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi

अनुमोदक :- श्री.संतोष पाटील महापौर,